# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

*India's National Spiritual Newspaper* ₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

**Editor : S. SAM SELVA RAJ** **16 Languages** **Associate Editor : Rev. Shashi Tiwari**

VOL: XXIII YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, JUNE 2021 No. 6


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**अनुवाद २८:१-८**

१. तुझा देव परमेश्र्वर याची वाणी तू लक्षपूर्वक ऐकशील आणि ज्या ह्या सर्व आज्ञा आज मी तुला निवेदन करीत आहे त्या मान्य करून पाळिशील तर तो पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांहून तुला उच्च करील.

२. तू आपला देव परमेश्र्वर याची वाणी ऐकशील तर ही सर्व वरदाने तुजकडे धांव घेऊन तुला प्राप्त होतील.

३. नगरात तू धन्य होशील, शेतापोतांत तूं धन्य होशील.

४. तुझे संतान, तुझ्या भूमीचे उत्पन्न, तुझी गुरेढोरे व तुझी शेरडे मेंढरे यांचे वस्त धन्य होतील.

५. तुझी टोपली व काथवट ह्या धन्य होतील.

६. तुझे येणे जाणे धन्य होईल.

७. तुझ्यावर चढाई करून येणारे तुझे शत्रु मार खातील, ते एका वाटेने तुजवर चढाई करितील पण तुझ्यापुढून सात वाटांनी पळून जातील, असे परमेश्र्वर घडवून आणील.

८. तुझ्या धाब्याच्या कोठारांस व ज्या ज्या कामास तूं हात घालिशील त्या सर्वांत बरकत येईल असे परमेश्र्वर करील. तुझा देव परमेश्र्वर जो देश तुला देत आहे त्यांत तो तुझे कल्याण करील.

## जरी सर्व काही जमिनीवर पडून वाया गेले, देवाचे एकहि वचन जमिनीवर पडणार नाही!



**Even if everything falls on ground waste, None of God's words will fall on the ground!**

**(पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांचा संदेश)**

"शमुवेल वाढत गेला; परमेश्र्वर त्याच्यासमागमे असे व त्याचे कोणतेहि वचन त्याने वायां जाऊ दिले नाही." (१ शमुवेल ३:१९).

मी लहान मुलगा होतो तेव्हा माझ्या आईच्या प्रेमळ मामाच्या आणि मावशीच्या देखरेखीखाली वाढत गेलो. माझे वडील भारतीय सैन्यात दूरवर काम करीत होते, आणि जेव्हा केंव्हा ते रजेवर येत असत, तेव्हा कुटुंबात त्यांचा आवडता मुलगा असल्यामुळे माझ्या करिता पुष्कळशा भेटी आणित असत. आम्ही एकत्रीत कुटंब असे राहात होतो. एकदा त्यांनी मला परदेशांतून आयात केलेली एक सुगंधीत अत्तराची बाटली दिली. माझी वाहवा केली आणि बाटली फारच सांभाळून वापरण्याची सुचना केली.

मी अतिशय आनंदाने तिचा स्विकार केला आणि माझ्या नातेवाईकांत मित्रांना आणि मंडळीच्या पाळकांना देखील दाखविली. माझा मित्र जो मजबरोबर उपासनेला आला होता तो सर्वांना ती मला माझ्या वडिलांनी दिलेली आहे असे फुशारकी मारून सांगत होता.

परंतु थोडक्याच दिवसात ती बाटली माझ्या हातातून खाली पडली आणि तिचे बारीक बारीक तुकडे झाले! बाटलीतील सुगंधीत अत्तर माझ्या डोळ्या देखत जमीनीवर नदीप्रमाणे वाहू लागले. अनेक वर्षांपूर्वी बसलेला धक्का आज देखील माझ्या मनात येतो.

तुम्हाला देखील एखाद्या घटनेमुळे जीवनाचे तुकडे-तुकडे झाल्या सारखे वाटले असेल. अनेक चांगल्या गोष्टी ज्या तुमच्या हातात होत्या, त्या हातातून निसटल्या असतील. आज तुम्हासाठी चांगली बातमी आहे! तुम्हाला तुमचा प्रभु देव येशू ख्रिस्त आहे!! तो दररोज त्याच्या वचनांद्वारे तुमचे पोषण करील!!! हि अमुल्य अशी वचने जमिनीवर खाली कदापी पडणार नाहीत. त्याच्या वचनांद्वारे आशीर्वाद प्राप्त करण्याकरीता, तुम्ही सकाळी लवकर उठून त्याची प्रार्थना करण्याची त्याचे पवित्र शास्त्र वाचण्याची आणि दिवसाकरिता धीराने त्याच्या वचनाची वाट पहाण्याची गरज आहे. हि सवय केवळ एक किंवा दोन दिवसां करिता ठरवून घ्यावयाची नाही तर जीवनभरासाठी लावून घ्यावयाची आहे.

"परमेश्वराने शिलोत पुन: दर्शन दिले, म्हणजे परमेश्वर आपल्या वचनाच्या द्वारे शमुवेलास प्रगट झाला. शमुवेलाची ही हकीकत सर्व इस्त्राएलांत पसरली."

(ऊर्वरीत पान ३ वर)

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



## from your dearly beloved brother...

**"मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुजवर प्रेम करीत आलो.."**



**OUR MISSION POLICY**

We should expound and teach the contemporary generation the undiluted teachings of the ancient and early Apostles. It is the need of the hour.


**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paul Raj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.

**CORE ADVISORS**
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Er. C.G.S. Babu Rao, B.Tech., M.Tech (DM)
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Dr. J.R. Jeyabalan
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Sis. Ajitha Mary, M.A.

**PUBLISHER, PRINTER & PROPRIETOR**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**E.Mail ID**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org /
www.echoofhiscall.com


प्रभु मधील अति प्रिय बंधुनो आणि बहिणींनो,

तुम्हा सर्वांना आणि तुमच्या प्रियजनांना आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या मधुर नामात शुभेच्छा.

आशा बाळगतो कि तुम्ही सर्वजण ठीक आहात. ख्रिस्त येशू मध्ये चांगले मित्र आणि आत्मिक साहसांतील कार्यातील सहकर्मी मी दररोज सकाळी रात्री दयेच्या राजासनाजवळ तुमची आठवण करीत असतो. कृपया हे लक्षात असू द्या की, तुम्ही माझ्या प्रार्थनेच्या आच्छादनाखाली आहात माझ्या प्रियांनो ज्या प्रभु परमेश्वराची मी सेवा करीत आहे. तो तुम्हाला असमाधानी ठेवणार नाही, किंवा तुम्हाला त्यागणार नाही. नेहमी प्रणाणेच मी अगदी सकाळ पासून तर रात्री उशीरापर्यंत माझ्या कौटुंबिक जबाबदाऱ्यां व्यतिरिक्त प्रार्थना, लिखाण, संदेश, शिकविल्यात, प्रशासकीय काम आणि आर्थिक गरजा या द्वारे देवाची सेवा करण्यात व्यस्त आहे. माझी प्रकृति ठीक आहे. "परमेश्वर माझा मेंढपाळ आहे; मला कांही उणे पडणार नाही. तो मला हिरव्यागार कुरणात बसवितो, तो मला शांत पाण्याजवळ नेतो, तो माझा जीव ताजातवाना करितो, तो आपल्या नामास्तव मला नीतिमार्गांनी लावितो. मृत्युच्छायेच्या दरींतूनही मी जात असलो तरी अरिष्टांस भीणार नाहीं, कारण तूं मजबरोबर आहेच; तुझी आंकडी व तुझी काठी मला धीर देतात." (स्तोत्र २३:१-४) माझी इच्छा आहे की तुम्ही तुमच्या जीवनात तुम्ही देखील याचा अनुभव घ्यावा.

देवाच्या कृपेद्वारे आमची मुख्य मंडळी, शाखा मंडळ्या; १७ भाषांत प्रसिद्ध करण्यात येत असलेले 'एको ऑफ हिज कॉल' मासिक, बायबल कोर, अभ्यासक्रम, नहेम्या बायबल कॉलेज,, शुभवर्तमान साहित्य छापणारे मुद्रणालय, सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल; इत्यादी सेवा व्यवस्थीत सुरू आहे; मला आमच्या सुरक्षीते करिता व सेवा कार्याच्या विस्तारा करिता तुमच्या प्रार्थनांची गरज आहे.'

### नहेम्या बायबल कॉलेज

या दिवसात आम्ही आमच्या नहेम्या बायबल कॉलेजची कार्यक्षमता अभिनव पद्धतीने वाढवून ती मजबूत करण्याविषयी देव आमच्या मनावर दबाव आणीत आहे. हे कॉलेज एका उच्च दर्जाच्या बायबल मध्ये विद्वान अशा व्यक्तिंच्या अध्यक्षतेखाली आणि योग्य व अनुभवी अध्यापकांच्या द्वारे कार्यरत आहे. आम्ही भारतात जी अधिकच मान्यता देणारी संस्था Asia Theological Association (ATA) त्यांच्याकडे त्याविषयी अर्ज पाठविला आहे. त्यांच्या प्रमाणित नमुन्यानुसार आम्हाला आमच्या ग्रंथालयात अधिक पुस्तकांची भर घालावी लागणार आहे. आमच्या विद्यार्थ्यांकरिता आम्ही आणखीन थियॉलॉजी आणि चिंतन-मननपर पुस्तके मिळविण्याचे प्रयत्न करित आहोत.

तुमच्याकडे अशी जुनी किंवा नवीन पुस्तके असतील तर तुम्ही ती आमच्या बायबल कॉलेजसाठी ती भेट म्हणून देवू शकता. आमच्या एका परदेशी वास्तव्यास असलेल्या मित्राने सांगितले की तो जहाजाने पुष्कळशी पुस्तके पाठवू शकतो, परंतु आम्हाला त्याचा खर्च भरावा लागेल. परतु ती रक्कम फार मोठी असेल, जी आमच्या आवाक्या बाहेरची असेल यासाठी आम्ही तुमच्या प्रार्थनांची अपेक्षा करीत

आहोत. आम्हाला पुस्तके, पुस्तके ठेवण्यासाठी रॅक, ग्रंथालयासाठी टेबल, संगणक इत्यादिंची निकडीची गरज आहे. कृपया प्रार्थना करा व देव प्रेरणा देत असेल तशी मदत करा.

### सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल

**आम्हाला आमच्या या शाळेच्या ग्रंथालयाकरिता देखील, विविध प्रकारची गोष्टिंची पुस्तके, डिक्शनरी, नाटिका, कादंबरी, कोडी, इत्यादि पुस्तकांची गरज आहे.** शाळेतील गरीब विद्यार्थी तुमच्याकडे अपेक्षेने पहात आहेत. देव सुचवेल तशा प्रकारे तुम्ही मदत करू शकता. प्रिय बंधु आणि बहिणींनो, तुम्हाला हे ठाऊक असावे कि आपण जे देवाच्या सैन्यातील आघाडीवर कार्य करणाऱ्या आपणा करिता हे दिवस अनुकूल नाहीत. आम्ही शारिरीक स्वास्थ, मिशन क्षेत्रात, व्यवस्थापनात, आर्थिक बाबतीत सैतानाच्या आव्हानांना आणि धमक्यांना सामोरे जावे लागत आहे. देव करो आणि त्याच्या आमच्याद्वारे आम्ही अनुभवीत असलेल्या धडपडची खरी कल्पना तुम्हाला कळून येवो. आम्हाला तुमच्या मदतीच्या हातांची आणि प्रार्थनांची गरज आहे.

आमचे ख्रिस्त येशूमध्ये जसे तुमच्यावर प्रेम आहे, तसेच या जगात देखील कोणाला तरी आमच्या विषयीची काळजी आहे हे समजल्यावर आमचे समाधान होईल.

सरतेशेवटी, आमचे जुने मित्र जे त्यांच्या भाषेतील आमचे मासिक वाचत आहेत ते आता वृद्ध झाले आहेत आणि आम्हांला आधार देऊ शकत नाहीत. काही जणांनी त्यांचे निवासस्थान बदलले आहे आणि त्यांनी आम्हाला तसे न कळविल्यामुळे आमची पुकळशी मासिके परत येत आहेत.

पुढील पिढीला शुभवर्तमान पाठविण्यासाठी आम्हाला नवीन वाचकांचे पत्ते हवे आहेत. यामुळे आम्ही तुम्हांला नम्र विनंती करीत आहोत की तुमचा थोडासा वेळ देऊन, तुमचे प्रियजन, मित्र, तुम्हांपासून दुर राहात असलेल्या कुटुंबातील सदस्यांचे पत्ते आम्हांला कळवा. (शक्य असल्यास त्यांचे फोन नंबर, ईमेल) त्या सर्वांना प्रत्येक महिन्याला मासिक पाठविण्यास आनंद होईल. मासिक एकूण १७ भाषांमध्ये प्रसिद्ध केले जात आहे.

देव तुम्हाला आशीर्वाद देवो

ख्रिस्त येशुमध्ये तुमचा दास

**पास्टर एस सॅम सेल्वाराज**

98412 71858 / 98410 71858

E.mail : sam@echoofhiscall.org

(पान १ वरून पुढे)

(१ शमुवेल ३:२९,४:९).

पवित्र शास्त्र सांगते देवाची कोणतीहि वचने जमिनीवर पडली नाहीत. (१शमुवेल ३:१९). तसे घडण्यामागे अनेक कारणे आहेत. प्रभु येशु ख्रिस्त जेव्हा एखाद्या व्यक्तिला त्याच्या हातात धरतो आणि त्याचा उपयोग करून घेऊ लागतो, ते केवळ काही वेळे पुरते नाही तर कायम स्वरूपी घेत असतो. "तुम्हांस पाचारण करणारा विश्वासू आहे. तो हे करीलच." (१ थेस्सल ५:२४). यशया ४६:४ या वचनात तो आश्वासन देतो. "तुमच्या वृद्धापकाळापर्यंतही मीच तो आहे; तुमचे केस पिकत तोपर्यंत मी तुम्हांस वागवीन. निर्माणकर्ता मीच आहे; वागविणारा मीच आहे. मी खांद्यावर वागवून तुमचा बचाव करीन." तेव्हा काळजी करू नका. तुमची परिस्थिती जरी अतिशय बिकट झाली असेल, ती प्रभु येशू ख्रिस्त सुधारील.

शमुवेल जो देवाचा माणूस त्याच्या जीवनाच्या सुरवातीपासूनच ते अगदी शेवटापर्यंत देवाची महत्कृत्ये अगदी खरी अशी सिद्ध झाली. तद्वतच तुमच्या जीवनात देखील तो अद्भूत कृत्ये करील व त्याची अभिवचने पुरी करील.

## प्रथमत: शमुवेलाचे बालपण

"नंतर एलकाना रामा येथे आपल्या घरी गेला आणि तो बालक एलीयाजकाच्या नजरेखाली परमेश्वराची सेवा करू लागला. एलीचे पुत्र अधम होते; त्यांना परमेश्वराची ओळख नव्हती." (१ शमुवेल १:१७).

पवित्र शास्त्र सांगते एलीचे पुत्र हफनी व फिनहास हे अनेक दुष्कृत्यांमध्ये गुंतलेले होते (१शमुवेल १:१३-१७,२४). एलीने त्यांना इस्त्राएल मध्ये अशी कृत्ये करू नका असे बोलून समजावण्याचा प्रयत्न केला तरी देखील त्यांचे त्यांनी ऐकले नाही; एली त्यांना म्हणाला, "माझ्या मुलांनो, असे करू नका; माझ्या कानावर जो बोभाटा येत आहे तो कांही ठीक नाही, तुम्ही परमेश्वराच्या प्रजेकडून पातक करवीत आहा, कोणी मनुष्याने दुसऱ्या मनुष्याचा अपराध केला तर न्यायाधीश त्याचा न्याय निवडील, पण कोणी परमेश्वराविरूद्ध पातक केले तर त्याची वकिली कोण करील?..." (१ शमुवेल २:२४-२५).



अशा परिस्थितीत, शमुवेल बाळ प्रभुची सेवा करीत होता. एक लहान मुलगा प्रभुची सेवा कशी करू शकतो?

शमुवेलाच्या आई-वडिलांनी त्याला मंदिरात एली याजका समोर सोडले. एली देवाची सेवा करीत असताना काय-काय करतो याकडे हे शमुवेल बारकाईने लक्ष देत होता. एली प्रार्थना करीत असताना, शमुवेल देखील त्यांच्या नाजुक पायांच्या गुडघ्यांवर येऊन प्रार्थना करीत असेल. आपले डोळे मीटून कदाचीत

(पान ३वरून)

त्याच्या शब्दात देवाची स्तुति करीत असेल, त्याचे आभार माणीत असेल!!! एलीला त्याचे डोळे उघडल्या वर शमुवेल देखील प्रार्थना करीत असलेला दिसला असेल आणि ते पाहून तो शमुवेलाची पाठ थोपटीत असेल. आणि त्याला आशिर्वाद देत असेल.

पवित्र शास्त्र सांगते शमुवेलाची आई त्याच्यासाठी एक लहानसा झगा तयार करी आणि दर वर्षी आपल्या पतीबरोबर वार्षिक यज्ञ करावयास येई त्या वेळी त्याला तो देत असे. शमुवेल बाळ सणाचे एफोद धारण करून परमेश्र्वराची सेवा करीत असे. (१शमुवेल २:१८१६). एफीद हे वस्त्र महायाजक परम पवित्र स्थानात प्रवेश करीत असताना घालीत असे.

शमुवेल लहान होता, तरी त्याची आई हन्ना त्याच्या करिता याजका सारखा झगा शिवत असे मला आठवते की माझी आई देखील कदाचीत माझ्या करीता आमच्या पाळका सारखे कपडे शिवत असे मी ते कपडे घातलेले पाहून तिला आनंद होत असे. चर्चमध्ये तसे कपडे घातलेले असे पुष्कळ जणांनी मला पाहिले होते आणि मला पाळक म्हणून खेळताना आणि पाळका सारखा उपदेश करताना देखील पुष्कळांनी पाहिले होते. आणि त्यामुळे मी पुढे भविष्यात देवाचा एक चांगला सेवक होईन असे बोलत असत.

आजकालच्या पालकांकडे पाहा! त्यांचे लेकरू मुलगा असो कि मुलगी असो त्याच्या करीता ते त्यांनी नट-नटी सारखे किंवा विदुषका सारखे दिसावे अशा तऱ्हेचे आधुनिक पोशाख खरेदी करीतात! पालक त्यांच्या लेकरांना जगीक शैलीचे जीवन जगावयास प्रवृत्त करतात. अगदी लहान वायतच लेकरे विचित्र केशरचना करू लागतात आणि मोहात आणि दैहिक वासनांत पडतात. "रात्र सरत येऊन दिवस जवळ आला आहे, म्हणून आपण अंधकाराची कर्मे टाकून द्यावी, आणि प्रकाशाची शस्त्रसामुग्री धारण करावी. दिवसाढवळ्या साजेल असे आपण शिष्टाचाराने चालावे. दंगलात व मद्याच्या धुंदीत, विलासात व कामसक्तित, कलहात व मस्तरांत नसावे, तर तुम्ही प्रभु येशू ख्रिस्ताला परिधान करा, आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका." (रोम १३:१२-१४).

## एक अनुभव :

एकदा एका ठिकाणी संदेश देण्याकरिता गेलेलो असताना तेथे मला एका देवाच्या सेवकाला आणि त्याच्या कुटुंबाला भेटण्याची संधी मिळाली. मी त्या देवाच्या सेवकाशी बोलत असताना आमच्या समोरून कानात कर्णफुले आणि चेन घातलेली तरुणी सारखी दिसणारी एक व्यक्ति गेली. मी त्यांना विचारले मुलगी कोणत्या इयत्तेत शिकत आहे? त्यांनी मला उत्तर दिले, की ती माझी मुलगी नाही, तो माझा मुलगा आहे! त्यांनी मला सांगितले. कि त्यांच्या गावात एक ख्रिस्ती तरुणांची सहभागीता आहे आणि सर्व तरुण पुरुष मुलींप्रमाणे पोषाख घालतात आणि तरुणी सारखे दिसतात! आम्ही बोलत असतानाच आणखीन एका तरुण मुलास आंत जाताना पहिले; मी त्यांना विचारीले हा मुलगा कोण आहे?"त्यांनी अतिशय दु:खीत होऊन उत्तर दिले. तो माझा मुलगा नाही, तर मुलगी आहे" सैतान अशा प्रकारच्या गोष्टी ख्रिस्ती कुटुंबांमध्ये फैलावत आहे आणि त्यांना नरकाच्या मार्गावर नेत आहे.

"प्रभु येशूच्या वतीने कोणकोणत्या आज्ञा आम्ही तुम्हांस दिल्या त्या तुम्हांस ठाऊक आहेत. देवाची इच्छा ही आहे की तुमचे पवित्रीकरण व्हावें. तुम्ही जर कर्मापासून स्वत:स दूर राखावे, देवाला न ओळखणाऱ्या विदेशी लोकांप्रमाणे कामवासनेने नव्हे, तर पवित्रतेने न अब्रूने तुम्हांतील प्रत्येकाने आपले पात्र कसे राखावे ते समजून घ्यावे. कोणी या गोष्टींचे उल्लंघन करून आपल्या बंधूला फसवू नये, कारण प्रभु सर्व गोष्टींचा सूड घेणारा आहे हे आम्ही तुम्हांस अगाऊ सांगितले होते व साक्ष पटविली होती. देवाने आपल्याला अशुद्धपणासाठी पाचारण केले नाही, तर पवित्रतेसाठी पाचारिले आहे. तर त्याचा अव्हेर करणारा तो मनुष्याचा नव्हे, तर तुम्हांस आपला पवित्र आत्मा देणारा देव ह्याचा अव्हेर करितो, असे होतो." (१ थेस्सल ४:२-८).

शमुवेलाच्या संपूर्ण जीवन मार्गात देवाचे एकही वचन जमिनीवर पडले नाही. प्रीय पालकांनो तुम्ही तुमच्या लेकरांना कशाप्रकारे वाढवीत आहात?

## दुसरे म्हणजे शमुवेलाचे तारुण्य



"हे त्या तरुणांचे पाप परमेश्र्वराच्या दृष्टीने फार घोर होते......." "इकडे शमुवेल बाळ हा वाढत गेला; परमेश्र्वर व मानव त्याच्यावर प्रसन्न होते." (१ शमुवेल २:१७.२६)

एलीचे पुत्र पूर्णपणे पापात जीवन जगत होते. तर दुसऱ्या बाजुस आपणास शमुवेल देव आणि मानव यांची कृपा संपादन करताना पहावयास मिळतो. देव

(ऊर्वरीत पान ६ वर)

## एक प्रेमाची विनंती

तुम्ही सर्व जण हे जाणून आहातच, सध्या आम्हाला सर्व स्टाफचे वेतन देण्यात, छपाईचा कागद खरेदी करण्यात आणि प्रवास खर्च भागविण्यास फारच कठीण जात आहे. सर्वसाधारणत: आम्ही आमच्या आर्थिक गरजा पुरविण्याची इतरांकडे मागणी करीत नसतो. तरी देखील ज्यांना या सेवाकार्याबद्दल प्रेम आहे. सेवाकार्य आवडत आहे, त्या आपणांस विनंती करीत आहोत. तुमचे दान मनी ऑर्डर, धनादेश (चेक), डिमांड ड्राफ्ट, फोन पे, किंवा एन.ई.एफ.टी. यापैकी कोणत्याही पद्धतीद्वारे पाठवून या सेवाकार्याला हाथभार लावावा. अधिक माहिती करीता या दूरध्वनीवर संपर्क साधावा. +91 9841271858 / 9841071858

**संपादक-एको ऑफ हिज कॉल**
**एस.सॅम सेलवाराज**

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे :-

१९ मे : एको ऑफ हिज कॉलच्या सेवाकार्याबद्दल स्तुति करूया

२० मे : आमच्या मुख्य मंडळीच्या वरिष्ठ सभासदांकरिता देवाची स्तुति असो.

२१ मे : आमच्या मुख्य मंडळीतील सर्व स्त्री-पुरुष आशिर्वादित आहेत.

२२ मे : आमच्या मुद्रणालयात १७ भाषेत एको ऑफ हिज कॉल मासिक छापून विविध मिशन क्षेत्रांना पाठविण्यात आल्याबद्दल स्तुति असो.

२३ मे : आमच्या सर्व प्रार्थना सहकारी, वर्गणीदार, विश्वासातील सहकारी, आजीवन सहकारी, महान सेवेतील सहकारी आणि त्यांच्या कुटुंबीयांकरिता स्तुति करूया.

२४ मे : आमच्या सर्व मंडळ्यांच्या पाळकांबद्दल आणि कार्यकारी अधिकाऱ्यांबद्दल स्तुति करूया.

२५ मे : शुभवर्तमान न पोहचलेल्या ठिकाणी ते पोहचविण्यास देवाने आम्हांला आशिर्वाद दिल्याबद्दल.

२६ मे : आमच्या मुख्य उपासनामंदिरात दर रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत घेण्यात येत असलेल्या उपासनाबद्दल स्तुति करूया.

२७ मे : बालाजी नगर, संतोषपुरम आणि बेलाचरी याठिकाणी होत असलेल्या रविवारच्या उपासनेबद्दल स्तुति करुया.

२८ मे : देवाने आमच्या सेंटपॉलस मॅट्रीक्युलेशन शाळेचा कारभार उत्तम स्टाफद्वारे चालविण्यास आशिर्वाद दिल्याबद्दल.

२९ मे : आम्हांला आधार देणाऱ्या सर्व प्रियजनांबद्दल देवाची स्तुति करूया.

३० मे : मागिल महिन्यातील झालेल्या प्रत्येक सेवाकार्याबद्दल देवाची स्तुति करूया.

३१ मे : आमच्या सर्व राज्यातील समन्वयकांकरिता आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता स्तुति करूया.

०१ जून : आमच्या मंडळीत सहभागी झालेल्या सर्व नवीन विश्वासणाऱ्यांकरिता स्तुति करूया.

०२ जून : देवाने आमच्या सर्व मंडळ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षित ठेवल्याबद्दल स्तुति करूया.

०३ जून : देव आमचे वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबियांचे सर्व दुष्ट शक्तिंपासून रक्षण करित असल्याबद्दल स्तुति करा.

## प्रार्थने करीती मुद्दे

०४ जून : जागतिक शांततेकरीता प्रार्थना करूया.

०५ जून : या महिन्यातील सर्व सेवाकार्य आणि त्याच्या प्रतिफळासाठी प्रार्थना करूया.

०६ जून : आमच्या एको ऑफ हिज कॉलच्या सेवाकार्याचा विस्तार करण्याबद्दल प्रार्थना करूया.

०७ जून : जगातील सर्व देशांच्या ऐक्य आणि सुरक्षिततेसाठी प्रार्थना करूया.

०८ जून : बायबलकोर आणि पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या थियॉलॉजिकल अभ्यासक्रमाबद्दल प्रार्थना करूया.

०९ जून : ०१ जून २०२१ पासून नहेम्या बायबल कॉलेज पूर्ववत सुरू झाले यासाठी प्रार्थना करूया.

१० जून : आमच्या सर्व मंडळ्यांतील जे सभासद आमच्या विषयीची काळजी करतात त्यासर्वांबद्दल प्रार्थना करा.

११ जून : कोविड महामारीने पिडीत असलेल्या सर्वांकरिता प्रार्थना करूया.

१२ जून : आमच्या सेवाकार्याला आधार देणाऱ्या सर्व शुभचिंतकांकरिता आणि मित्रांकरिता प्रार्थना करूया.

१३ जून : सर्व देशांच्या राष्ट्रपति, पंतप्रधान आणि सरकारी अधिकाऱ्यांकरिता प्रार्थना करा.

१४ जून : आमचे सहसंपादक रेव्ह. शशि तिवारी आणि रेव्ह. रामकृष्णा यांना जलद प्रकृतिस्वास्थ्य लाभावे याकरिता प्रार्थना करा.

१५ जून : इंग्रजी मासिकाचे सहसंपादक बंधु एम. पौलराज यांना पूर्णपणे प्रकृति स्वास्थ्या लाभावे याकरिता प्रार्थना करा.

१६ जून : आपल्या मणीपुरी भाषेतील मासिकाचे सह-संपादक रेव्ह. डॉ. रीशीकांत सोरोटवाईबाम यांच्या प्रकृतिस्वास्था करिता प्रार्थना करा.

१७ जून : कोरोना व्हायरस या महामारीचे समूळ उच्चाटन व्हावे याकरीता प्रार्थना करूया.

१८ जून : आमचे वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्वाराज आणि त्यांचे कुटुंबिय सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिंपासून सुरक्षित रहावे यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरून)

या दोन्ही लोकांकडे पहातो. तो कोणाला आशीर्वाद देईल? तो कोणाला वर उचलील? तो कोणावर भरोसा ठेविल?

माझ्या तरुणपणात माझ्या पालकांनी मला इंडिया हेरॉल्डचे संस्थापक पास्टर देवदासन यांच्या स्वाधीन केले. मला त्या देवाच्या माणसाची



सेवा करण्याची संधी मिळाली. मी त्यांच्याशी इमानदार होतो. ते प्रत्येक गोष्ट अतिशय अचूक, उत्कृष्टपणे करीत असत. ते एक नमुनेदार आणि वक्तशीर अशी व्यक्ति होते. मी त्यांच्या करिता नेहमी काम करीत असताना माझ्या कामामुळे ते संतुष्ट होतील. यांकडे लक्ष ठेवून ते करीत असे. आणि कोणत्याही गोष्टीमुळे नाराज होणार नाही.

माझे पाळक त्यांच्या गुडघ्यांवर सर्व जगभरातील लोकांकरिता प्रार्थना करण्यात अनेक तास घालवित असत. त्यांना त्या स्थितीत पाहून, मी देखील त्यांच्या प्रमाणे प्रार्थना करण्यास शिकलो. त्याचप्रमाणे अनेक तास गुडघ्यावर देवाची वचने वाचून त्यावर मनन करणे देखील शिकलो. त्यांच्या पासून मी शिकलेल्या इतर गोष्टी नमुद करावयाच्या त्या म्हणजे-देवाचा संदेश त्याच्या स्वत:कडूनच प्राप्त करणे, देवाच्या वचनांनुसार चालणे, प्राप्त झालेलेल विचार लिहून ठेवणे व ते प्रसिद्धिस देणे, देवाच्या वचनांवर संदेश देणे, सर्व मिळकतीतील दहावा भाग बाजूला करून देवाला दशमांश देणे, विशेष दानाद्वारे इतर सेवा कार्यांना आधार देणे, मला भेटण्यास येणाऱ्या कोणत्याही देवाच्या सेवकास प्रीतस्तव दान देणे नेहमी स्वच्छ कपडे परिधान करणे. इत्यादी मी त्यांच्या पासून अशा उत्तम गोष्टी शिकलो आणि माझ्या देवाला माझे पाळक आणि त्यांच्या मोठ्या कुटुंबातील त्यांच्या पत्नीसहित इतर सदस्य डॉ. डी. टि. राजा, डॉ. डी.एस.स्पर्जन, बंधु थियोडर, बंधु वेस्ली देवदासन हि मुले आणि त्यांच्या मुली; नातवंडे अशा सर्वांना मी संतुष्ट केले. त्या सर्वांचे देखील मजवर खुप प्रेम होते. त्यानंतर पुढील दिवसात देव मला प्रतिफलादाखल आशिर्वादित करीत गेला.

"अहाहा, तुझे शास्त्र मला किती प्रिय आहे! दिवसभर त्याकडे माझे लक्ष लागलेले असते. तुझ्या आज्ञा मला आपल्या वैऱ्यांच्यापेक्षा शहाणे करितात; कारण त्या सदोदित माझ्याजवळच आहेत. माझ्या सर्व शिक्षकांपेक्षा मला अधिक समज आहे, कारण मी तुझ्या निर्बधांचे मनन करितो. वयोवृद्धांपेक्षा मला अधिक कळते; कारण मी तुझे विधि पाळितो." देव माझ्या जीवनात मजशी काही बोलला त्यापैकी काही देखील जमिनीवर पडले नाही व्यर्थ गेले नाही. तो माझे रक्षण करितो. तो माझ्या सर्व गरजा पुरवितो. आमेन.

सध्या जगिक जीवन जगत असलेल्या प्रिय तरुण आणि तरुणींनो तुम्हाला वरील अनुभव आहे कां? तुम्ही कशा प्रकारचा पेहराव परिधान केलेला आहे? तुम्ही दुसऱ्यांना आकर्षित करणारे वस्त्र परिधान करीत आहात कां? तुमची केशभुषा इतरांना आकर्षित करणारी आहे कां? स्वत:चे परिक्षण करा. "देवाचा उपहास व्हावयाचा नाही." (गलती ६:७)

आज स्वत:स देवाचे दास म्हणविणाऱ्या कांही तरुण पुरुष आणि तरुण स्त्रियांकडे पाहात त्यांच्या पेहराव करणाऱ्या पद्धतीकडे, त्यांच्या केशरचनेकडे, त्यांच्या मिशांकडे आणि त्यांच्या दाढीकडे पाहा. त्यांच्या जगीक परंतु चुकीच्या पेहराव परिधान करण्याच्या पद्धतीमुळे त्यांना असे वाटते की ते इतरांना आकर्षित करू शकतात. ते कदाचीत त्यांच्या सारखा पेहराव करणाऱ्या कांही स्त्री-पुरुष गटाला आकर्षित करू शकतील. परंतु अशा आणि आधुनिक सेवेद्वारे, त्यांना देवाला कदापी संतुष्ट करु शकत नाही आणि एकाही व्यक्तिला त्याच्या पापी जीवनातून मुक्त करण्यास मदत करु शकत नाही.

सावध व्हा! शमुवेलाच्या तरुणपणात त्यांच्या विनयशिलतेने आणि विश्वासाने देव आणि मनुष्य संतुष्ट होऊ शकले, त्यांच्याशी बोललेला देवाचा एकही शब्द व्यर्थ गेला नाही.

देवाच्या प्रिय लेकरा, तुला हा अनुभव आहे कां? देवाने त्याच्या सेवेकरिता पाचारण केलेले काही तरुण लोक त्यांच्या सेवेच्या सुरवातीच्या काळात चमकतात. परंतु ते त्या स्थितीत फार काळ रहात नाहीत. विवाहानंतर काही जण पूर्णपणे बदलतात. त्यांच्या रहाणीमानात बदल होतो आणि त्यांनी पूर्वी विश्वास ठेविलेल्या देवाच्या सिद्धांतात देखील बदल होतो. त्यांना झालेल्या देवाच्या पाचारणाचा त्यांना विसर पडतो. त्यांच्या आत्मिक दर्जा घालवून बसतात आणि पुन्हा त्यांच्यात बदल होऊ शकेल अशा स्थितीत येतात. समाजात कदाचित आपल्याला अतिशय वरचे स्थान प्राप्त होईल. परंतु प्रेषितांच्या शिक्षणास अनुसरण्याची आपण काळजी घेतली पाहिजे आणि या आधुनिक पीढीला प्राचीन आणि सुरवातीच्या प्रेषितांचे प्रखरता कमी न केलेले शिक्षण दिले पाहिजे ही काळाची गरज आहे. देवाचे सेवक जे या शिक्षणाशी विवाहबद्ध झालेले आहेत तेच बराच काळ सेवा करू शकतात आणि आशीर्वादीत जीवन जगु शकतात. अशा लोकांसाठी विजय निश्चित आहे आणि आपल्या प्रभुला देखील अशा लोकांची गरज आहे!

## तिसरे म्हणजे शमुवेल वाढत गेला; परमेश्वर त्याच्या समागमे असे (१ शमुवेल ३:१६)

प्रभुची स्तुती असो! आता शमुवेलाची वाढ होऊन तो प्रौढ झाला. आता देखील परमेश्वर त्याच्या बरोबर होता. बालपण आणि तरुणपण हे प्रौढते पेक्षा वेगळे असते. तुमच्या लहानपणी किंवा तारुण्यात तुम्हाला तुमच्या आई-वडीलांकडून किंवा समाजाकडून आधार मिळू शकतो. प्रौढपणात आपल्याला देवाच्या आधाराची गरज असते. तुम्ही वेगवेगळ्या परिस्थितीतून जात असता-जसे, विवाह, लेकरे, आर्थिक समस्या, सामाजिक जीवन, कौटुंबिक समस्या अशा परिस्थितीत दैवी कृपेशिवाय विजयी जीवन जगू शकत नाही. संरक्षण आणि मार्ग दर्शन यांची

निश्चितच गरज भासणार.

मी पूर्ण वेळ सेवेमध्ये येण्याअगोदर शासकीय नोकरी करीत होतो. तेथे कार्यालयात माझा एक मित्र होता. मी जेवणाच्या सुट्टीच्या वेळेमध्ये शुभवर्तमान हस्त पत्रिका वाटून उपदेश करीत असे. मी कार्यालयातील इतरांपेक्षा वेगळे जीवन जगत होतो. माझे अशा प्रकारचे जीवन पाहून, माझा मित्र मला चिडवित असे व माझ्या विरूद्ध माझ्या वरिष्ट अधिकाऱ्यांना तक्रार करीत असे. या त्यांच्या वागण्यामुळे मला मानसिक त्रास होत असे. मी त्याज करिता प्रार्थना करित असे. काही वर्षानंतर मला तो भेटला, तेव्हा त्यांच्या रहाणीमानात, वागण्यात झालेला बदल पाहून मी आश्चर्यचकीत झालो. त्यांच्या शर्टावर 'येशू जीवीत आहे' असा एक बिल्ला लावलेला आणि हातात बायबल असलेले पाहिले. तो आंता एक अगदी वेगळा मनुष्य दिसत होता!

मी आश्चर्याने त्याला विचारले 'प्रिय मित्रा' तुझ्यात हा बदल कसा? तू मजपेक्षा अधिक जलद गतीने चालत असलेला दिसतोस. त्याने उत्तर दिले, बंधु सॅम, माझा विवाह झाला, मला चांगली नोकरी नव्हती. घरात शांति नव्हती. पैशांची कमतरता होती. आम्हांला लेकरे झाल्याचा आशीर्वाद नव्हता. सर्वजण माझी चेष्टा करीत असत. मला या सर्वांतून सुटण्याचा मी प्रयत्न करीत होतो. परंतु मला माझ्या आशाहीन, निद्राहीन आणि जीवनातील शापग्रस्त स्थितीतून बाहेर काढण्याकरिता कोणीही पुढे झाला नाही. मला माझ्या या समस्यांतून सोडविण्याकरिता मला मदत करील अशा सर्वश्रेष्ठ देवाची गरज होती.

"अशा स्थितीत असताना, मला एक शेजारी होता जो त्याच्या ध्वनिक्षेपका मधुन येशू ख्रिस्त नावाच्या कोणत्या तरी व्यक्तिची गाणी म्हणत असे आणि त्याच्या सामर्थ्या विषयी बोलत असे. काय करावे हे मला सुचत नव्हते. एके दिवशी मी कोणाच्याही लक्षात न येता एका छोट्या चर्च मध्ये प्रार्थना सुरु असताना प्रवेश केला व एका कोपऱ्यात बसलो. त्या पाळकाला माझ्या विषयी, किंवा माझ्या समस्यांविषयी माझ्या दु:खीत स्थितीची कल्पना नव्हती." (मत्तय ११:२८)

**"अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या म्हणजे मी तुम्हांला विश्रांती देईन."** यावर स्पष्टीकरण देत होते. त्यांचे प्रत्येक शब्द माझ्या अंत:करणात शिरले आणि अंत:करणात एक प्रकारचे कंपन सुरु झाले, माझ्या विचार शक्तिच्या, आणि कल्पनेच्या पलिकडे अशा दैवी स्पर्शाचा अनुभव आला.

त्या दिवशी मला जाणवले कि एक देव आहे आणि त्याचे नाव येशू ख्रिस्त आहे. किती तर अद्भूत असा अनुभव! त्याच दिवशी मी माझ्या मुखाने येशू ख्रिस्ताला माझ्या सर्व पापांची कबुली दिली, मला पापांची क्षमा मिळाली आणि बंधु सॅम यांच्यामुळे मला नवीन हृदय प्राप्त झाले. मला तारणाचा अनुभव मिळाला. माझ्या कुटुंबाचे देखील तारण झाले. आता आम्हा सर्वांना देवाचा पवित्र आत्मा चालवितो. माझ्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताने माझे सर्व दु:ख निवारण केले आणि आता तो माझ्या सर्व गरजा पुरवित आहे.

प्रिय वाचका आज तुला उद्धारकाची गरज आहे! तुला एका देवाची गरज आहे!! ख्रिस्ती लोकांच्या शिकवणी बद्दल चुकीचे बोलणाऱ्या लोकांचे ऐकू नका किंवा लक्ष देवू नका जो सामर्थी निर्माणकर्ता आणि देव तो म्हणतो, "मूढ आपल्या मनात म्हणतो देव नाही."(स्तोत्र ५३:१) आणि "ज्यांचा नाश होत आहे त्यांस वधस्तंभाविषयींचे शिक्षण मूर्खपणा आहे..."(१ करिंथ १:१८). तुझा जन्म यशस्वी होण्याकरिता झाला आहे. "ऊठ, प्रकाशमान हो, कारण प्रकाश तुजकडे आला आहे परमेश्वराचे तेज तुजवर उदय पावले आहे." (यशया ६०:१).

शमुवेल देव त्याजबरोबर नेहमी होता अशा स्थितीत वाढत गेला. त्यामुळे परमेश्वर त्याजशी बोलला ते कदापी व्यर्थ गेले नाही. प्रिय मित्रा, तू कदाचित लहान असशील, तरुण प्रौढ किंवा वयातील पुरुष असशील. परंतु देवाचे सामर्थ्य कदापी कमी होत नाही! आता त्याजकडे ये, विजय हा निश्चित आहे!!

## चौथे-शमुवेल वृद्ध मनुष्य

"दाना पासून बैर शेबापर्यंत राहणाऱ्या सर्व इस्राएल लोकांस विदित झाले की शमुवेल हा परमेश्वराचा संदेष्टा व्हावयाचा ठरला आहे." (१ शमुवेल ३:२०).

"तुम्हांस पाचारण करणारा विश्वासू आहे, तो हे करीलच." (१थेस्सल ५:२४).

**आता शमुवेल सर्व इस्त्राएलाकरिता संदेष्टा आणि शास्ता होता. संदेष्टा होण्यासाठी देवानेच त्याला बोलाविले होते. (१ शमुवेल ३:२०) पुढे शमुवेल रामामध्ये राहिला आणि मिस्ता, गिलगाल आणि बेथेल येथे शास्त्याची भूमिका पार पाडली. तो संदेष्टा आणि शास्ता देखील होता. त्याच्या उतारवयात त्याचे दोन्ही पुत्र त्याला मदत करीत होते. शमुवेल हा किती चमत्कारीक आणि आशीर्वादित होता!**

पुढे इस्त्राएल लोकांना त्यांच्यावर राज्य करण्याकरिता राजा हवा होता. तेव्हा देवाच्या आज्ञेनुसार, शास्ता या नात्याने त्याने शौलाला राजा होण्यासाठी अभिषेक केला. शमुवेल त्याच्या जीवनाच्या शेवटापर्यंत संदेष्टा आणि शास्ता राहिला. मला वैयक्तिक रित्या शमुवेलाचे खुप कौतुक वाटते.

## एक अनुभव

मी राज्य शासनात नोकरी करीत

The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittance.

| Bank | Branch | Name | Account Number | IFSC CODE NO. | SWIFT CODE |
|---|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | 102329 34679 | SBIN 0000249 | SBI NIN BB 455 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | 6038 05022319 | ICIC 0006038 | |

होतो, त्यावेळी कार्यालयाकरिता एक नवीन इमारत बांधण्यात येत होती. बांधकाम पूर्ण झाल्या नंतर कार्यालय नवीन जागेत हलविण्या अगोदर कार्यालयीन स्टाफला मुर्तिंना यज्ञ करण्याची इच्छा होती. परंतु एक अगदी वरिष्ठ असा अधिकारी जो ख्रिस्ती नव्हता. त्याने मला निर्देशिले की त्या ठिकाणी प्रार्थना करावी आणि मी माझे कार्यालय इमारतीच्या अगदी वरच्या मजल्यावर हलवावे. आणि त्याने जाहिरपणे सांगितले की, आपल्याकडे सॅम सेल्वाराज हा नेहमी कोणती तरी प्रार्थना करणारा देवाचा सेवक असताना आपण आपली वेळ आणि पैसा जगिक प्रार्थना करणाऱ्या पुजाऱ्याला का आमंत्रित करावे. आणि मला सर्वांच्या अगोदर माझे कार्यालय वरच्या मजल्यावर हलविण्याची सुचना करुन माझा सन्मान केला. अशा तऱ्हेने देवानी मला एकाच वेळी शासकीय कर्मचारी आणि पाळक होण्याची संधी दिली. तुम्हाला या अगोदरच कल्पना आहे की शासनाने मला एको ऑफ हीज कॉल सेवा कार्य करण्याची विशेष परवानगी दिली होती.

पुढे जेव्हां, देवाने शौलाला राजा रहाण्यास नापसंद केले, शमुवेलाने दाविदाला इस्त्राएलाचा राजा म्हणून अभिषेक केला. दाविद शमुवेलाला त्याचा आत्मिक पिता समजत होता. शमुवेलाचा मृत्यु झाला. तेव्हा त्याजसाठी सर्व इस्त्राएलनी शोक व्यक्त केला.

प्रिय याचका, तुझ्या आयुष्यात तूं अशा प्रकारची बढती अनुभवली आहेस कां?

शमुवेलाच्या बालपणात, तारुण्यात, प्रौढपणात आणि उतारवयात देखील देवाने त्याचे रक्षण केले आणि त्याच्या बाबतीतील एकही शब्द व्यर्थ जाऊ दिला नाही. प्रभु देव पूर्वी प्रमाणेच तुमच्या बरोबर राहून त्याचे प्रेम देवो आणि तुमची काळजी घेवो. विश्वास ठेवून जीवंत अशा येशू ख्रिस्ताकडे या!! आमेन

●●●


## We Need Library Books

we also need used **library books which are general in nature** such as **Story Books, Fictions, Novels, Fables, Dictionaries, Puzzles, Word Twister and Dramas** for our **St. Paul's Matriculation School**. Please Contact :

**Pr. S. Sam Selva Raj,**
**Echo of His Call,**
Cell : 98412 71858 / 98410 71858
E.mail : sam@echoofhiscall.org

## TAX EXEMPTION

Donations by any individual or organization to **Echo of His Call Educational Trust** are eligible for Income Tax exemption under Section 80G of the Income Tax Act. Official receipts will be issued for this purpose. Please make your Demand Drafts / Cheques / M.O. for such donations in favour of **Echo of His Call Educational Trust** and send to us.

**Account Name** : **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST**
**Account Number** : **1023 2923 805**
**Bank Name** : **STATE BANK OF INDIA**
**Branch** : **TRIPLICANE, CHENNAI - 600 005**
**IFSC Code** : **SBIN 0000249 | SWIFT Code : SBI NIN BB 455**

# NEHEMIAH BIBLE COLLEGES Estd.:1992

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

## ECHO OF HIS CALL MINISTRIES (ESTD.: 1969)

**Recognised by the International Christian Leaders & Senior Pastors for the 50 Years!**

**Applied accreditation for ATA**

**RESIDENTIAL COLLEGE, Velachery**
**(Medium: English & Hindi)**
Course : Certificate Course / Diploma in Theology
Qualification : 10th Standard

**EVENING COLLEGE, Chepauk & Santhoshapuram**
**(Medium : Tamil)**
**Course** : Certificate Course / Diploma in Theology
*Monday, Tuesday & Thursday at 6.30 p.m. to 8.30 p.m.*
(Evening Classes - Chepauk)
Qualification : 10th Standard

**C.Th., - One Year**
**D.Th., - Two Years**

Golden Opportunity! Don't miss!!
God is Calling you!!!

Classes Start on : 01-06-2021

**For more Details & Application Forms Please Contact:**
**Pastor S. Sam Selva Raj, Founder - President**
**Nehemiah Bible College**
10, Mohammed Abdullah 2nd Street, Bells Road, Opp. Cricket Stadium, Chepauk, Chennai - 600 005, India.
**Phone : (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766, Cell No : (+91) 98410 71852, 95661 31858**
**E.mail : sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in Websites : www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com**



# PIT TO PALACE

# खड्यातुन महालापर्यंतची मालिका

**(रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)**

**"वाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे" (मत्तय २४:१५)**

माझ्या सेवा कार्याच्या १९७२च्या अगदी सुरवातीच्या दिवसात मला देवाच्या पवित्र आत्म्याने चेन्नाई मधील सईदापेट या ठिकाणी संजीवन सभा आयोजित करण्याविषयी प्रेरीत केले. सभेसाठी लोकांना आमंत्रित करण्याकरिता भित्ती पत्रके हस्त पत्रिका इत्यादी माध्यमांद्वारे पुष्कळ जाहिरात केली. मी माझ्या इतर सहकाऱ्यांसह लोकांनी सभेस येण्याकरिता शक्य तेवढे प्रयत्न केले.

या सभेकरिताच केवळ विशेष प्रार्थना करण्यात आल्या. माझ्या काही मित्रांनी वाद्ये आणि गाण्याच्या पत्रिका आणल्या. सभा सुरू करण्याच्या वेळेपर्यंत आम्हांला सभेसाठी येत असलेले कोणीही दिसले नाही. आम्ही पुष्कळ वेळ वाट पाहिली. सरतेशेवटी दोन बंधु सभेसाठी आले. माझ्यासह ज्या सर्वांनी सभेकरिता श्रम घेतले होते, त्यांना दु:ख वाटले. त्यांनी मला विचारले, "देवाने आपल्या प्रामाणिक प्रार्थनांना कां उत्तर दिले नाही, आणि आपण घेतलेल्या श्रमाचा का मान राखला नाही" मी त्यांना म्हटले कदाचीत देव त्यांच्या वेळेत उत्तर देईल. मी मात्र आशा सोडली नाही. मी माझ्या देवावर भिस्त ठेवून खंबीर राहिलो. (१शमुवेल ३०:६).

अशा परिस्थितीत आम्ही सभेस सुरवात केली, स्तुति गीते गाईली व मी सामर्थ्यशाली असा संदेश दिला. परिणामी दोघा उपस्थित बंधुंपैकी एकाने त्याचे जीवन प्रभुला समर्पित केले आणि पुढे काही दिवसांनी मजबरोबर प्रभुच्या सेवेत सहभागी झाला.

आता देवाने भारतात आणि परदेशात हजारो लोकांच्या उपस्थितीत असलेल्या सभांमध्ये संदेश देण्याकरिता मला तयार केले आहे. देवाचे नाम गौरविले जात आहे. हे असे घडून येण्याकरिता मला अनेक वर्षे धीराने आणि विश्वास धरून वाट पहावी लागली.

प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो, तुम्ही अपयशाच्या नावेतून प्रवास करीत आहात कां? तुम्ही असा रिचार करीत आहा कां, की तुमच्या कठिण परिश्रमांना आणि प्रार्थनांना फळ येत नाही? आम्ही अतिशय क्रियाशील असतो आणि तात्काळ फळाची अपेक्षा करित असतो. अशा वेळी देव शांत-स्तब्ध राहून त्याजवरील आपल्या विश्वासाची आणि धीराची परिक्षा घेत असतो.

**"....नाश होणाऱ्या सोन्याची परिक्षा अग्नीने करितात, त्या सोन्यापेक्षा मुल्यवान असे जे तुमच्या विश्वासाचे परीक्षेत उतरणे, त्यापासून प्रशंसा, गौरव व मान ही फळे येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्या वेळेस मिळतात." (१ पेत्र १:६)**

देव तुम्हांला आशिर्वाद देवो.

♦♦♦

## एको ऑफ हिज कॉल

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-** **आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

तुमची पत्रे, प्रार्थना विनंत्या आणि आर्थिक मदत मनी-ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्ट, एन.इ.एफ.टी, पेपाल, फोन पे, जी पे ९८४१०७१८५८ या क्रमांकावर किंवा खालील पत्त्यावर पाठवू शकता.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

**ECHO OF HIS CALL**
10, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai - 600 005, India
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell: (+91) 98410 71852, 95661 31858
E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com

YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## THIS IS YOUR MINISTRY! PLEASE DO IT FOR GOD'S GLORY!! WE NEED MORE READERS !!!

Please write below atleast 10 names, addresses, E.mail addresses and Cell Phone Numbers of your friends and relatives. We will send **Echo of His Call Magazine** to them as a gift from you each month freely.

1.______________________________

2.______________________________

3.______________________________

4.______________________________

5.______________________________

6.______________________________

7.______________________________

8.______________________________

9.______________________________

10.______________________________

**Please use additional sheets if you have more addresses. God will reward you.**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JUNE 2021**

**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

## *JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**